# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र






०७१८४ - २५४७०२ sp.bhandara@gov.in / pilcb.bhandara@gov.in


जा.क्र. ५४७ /जनसंपर्क कक्ष/वार्तापत्र, पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा दिनांक ११/१०/२०१८

## विशेष वार्तापत्र

## गोधनाची अवैध वाहतुक करणारी कंटेनर गाडी पकडली, १ अटकेत

## भंडारा जिल्हा पोलीसांची कार्यवाही

**पोलीस ठाणे भंडारा :** — दिनांक १०/१०/२०१८ चे रोजी पोलीस अधीक्षक भंडारा विनीता साहू व अपर पोलीस अधीक्षक रश्मी नांदेडकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस स्टेशन भंडाराचे ठाणेदार सुधाकर चव्हाण व सहकारी कर्मचारी हे लाखनी कडुन भंडारा कडे एन. एच ६ रोड समोर नाकाबंदी करीत असतांना मिळालेल्या माहीतीच्या आधारे वेळीच सर्तकता दाखवुन शिताफिने लाखनी कडुन भंडारा कडे एन. एच ६ रोड समोरुन येणारा कंटेनर क्रमांक एम.एच. २० डी ई ६११६ ची झडती घेतली असता त्यामध्ये अवैधरित्या जनावरांना कोंबुन क्रूरतेने वागवुन वाहतुक करतांना कंटेनर गाडी मिळुन आली.

सदर कंटेनर क्रमांक एम.एच. २० डी ई ६११६ मध्ये एकुण २० म्हैस व २ रेडे अंदाजे किमंती ४,००,०००/— रू, कंटेनर गाडी क्रमांक एम.एच. २० डी ई ६११६ किंमती २०,००,०००/रू, असा एकुण किमंती २४,००,०००/— रू मिळुन आल्याने आरोपी १)शेख अनिस शेख उस्मान शेख, वय ३४ वर्षे, रा. कारकिन, ता. पैठण जिल्हा औरगांबाद यांचे विरूध्द पोलीस ठाणे भंडारा येथे कलम ११(ड)(च) प्राणी क्रुरतेने वागविणे प्रतिबंध अधिनीयम १९६० अन्वये गुन्हा नोंद केला असुन सर्व गोधन भागीरथा गौ अनुसंघान बहुदेशीय संस्था मलीपार चांदोरी ता. जिल्हा भंडारा येथील गोशाळेत ठेवण्यात आले आहेत. सदर गुन्हयातील आरोपीस यास अटक करण्यात आले आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार राजेन्द्रवंशी गोंडाणे पोलीस स्टेशन भंडारा करीत आहेत.

(जितेद्रं के आडोळे)
पोलीस उपनिरीक्षक
जनसंपर्क अधिकारी
संपर्क क. ९४०३१०९७२०

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.